।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ ■ वर्ष ६ वे ■ अंक ३१९ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

* सुविचार *

सर्व साधारण व्यक्ती सुप्त मेंदूचा केवळ १० टक्केच वापर करतो.

## SPOT NEWS

### 'एमपीएससी'ची भरती प्रक्रिया जलद गतीने होणार

● **नागपूर** – महाराष्ट्रात २०२६ मध्ये ७०,००० हून अधिक सरकारी पदांची मेगा भरती होणार असून यामध्ये पोलिस, तलाठी, आणि शिक्षकांसह इतर अनेक विभागांतील रिक्त पदे भरली जाणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भरती प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले असून २०,००० पदे एमपीएससीद्वारे भरली जातील. मात्र भरती प्रक्रिया राबवण्यास अनेकदा अडचणी येतात तसेच राज्य सरकारच्या विविध विभागाकडून मागणी पत्र देण्यामध्येही प्रचंड विलंब होतो. त्यामुळे राज्य सरकारने एमपीएससीची भरती प्रक्रिया जलद गतीने घेण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला (एमपीएससी) बळकट करण्याचे आश्वासन दिले खरे परंतु, सातत्याने रखडत चाललेले निकाल, परीक्षा, निवड प्रक्रिया आणि आरक्षणाच्या गोंधळामुळे राज्यातील स्पर्धा परीक्षार्थी चिंताग्रस्त झाला आहे. मात्र, आयोगाने यावर उपाय शोधला आहे. सरकारने तीन सदस्यांची नियुक्ती केली असून यामुळे एमपीएससी बळकट होणार आहे. तसेच निकाल आणि नियुक्तीच्या प्रक्रियेला गती येण्याची शक्यता व्यक्त केली जाते. राजीव निवतकर, दिलीप भुजबळ आणि महेंद्र वारभुवन यांची नियुक्ती केली होती.

### राज्यात १०० लाख टन साखरेचे उत्पादन

● **पुणे** – यंदाच्या ऊस गाळप हंगामाच्या सुरुवातीला देशात ३५० लाख टन, तर राज्यात ११० लाख टन साखरेचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, आता हे एकूण साखरेचे उत्पादन अनुक्रमे ३१५ आणि १०० लाख टन होईल, असे चित्र आहे. राज्यात आतापर्यंत ९८.८७ लाख टन, तर देशात २७१ लाख टन उत्पादन झाले आहे. राज्यात पुढील १० दिवसांत गाळप हंगाम संपण्याची शक्यता आहे. देशातून यंदा सात ते आठ लाख टन साखर निर्यात, तर ३१ लाख टन साखर इथेनॉलकडे वळविली जाणार आहे. देशात यंदा गाळप हंगाम सुरू झाल्यानंतर सुरुवातीला ३५० लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. मात्र, ३१ मार्चअखेर देशात २७१ लाख टन उत्पादन झाले आहे.

# शाळांची पटपडताळणी

## दुसरी ते आठवीबरोबर नववी, अकरावीच्याही परीक्षा?

● **पुणे । वीरभूमी** –

राज्यातील शाळांची नियतकालिक मूल्यांकन चाचणीदरम्यान पटपडताळणी करण्यात येणार आहे. त्यानुसार ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल या दिवशी शिक्षण विभागाचे पथक शाळांना भेट देऊन विद्यार्थी उपस्थितीचा आढावा घेऊन त्याची प्रणालीमध्ये नोंद करणार आहे. पटपडताळणीची प्रक्रिया एकाच वेळी पूर्ण करण्यासाठी नववी आणि अकरावीच्या परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचणी घेतली जाणार आहे. त्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दुसरी ते आठवी या इयत्तांची ११ एप्रिल, १५ एप्रिल आणि २२ एप्रिल रोजी अनुक्रमे प्रथम भाषा, गणित आणि तृतीय भाषा या विषयाची परीक्षा घेतली जाणार आहे. याच काळात आता शाळांमध्ये पटपडताळणी प्रक्रियाही राबवली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचनांनुसार, इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गाची पटपडताळणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आयोजित केलेल्या पॅट परीक्षेच्या दिवशी म्हणजेच ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी करावी. इयत्ता नववीची मराठी, गणित आणि इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षा ११ एप्रिल, १५ एप्रिल, २२ एप्रिल रोजी आयोजित करावी. इयत्ता अकरावीची मराठी, भौतिकशास्त्र, इंग्रजी या विषयांची वार्षिक परीक्षाही याच दिवशी आयोजित करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

इयत्ता दहावी, इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्याची आवश्यकता नाही. राज्य मंडळाच्या परीक्षेतील विद्यार्थी उपस्थिती ग्राह्य धरली जाणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## गुड फ्रायडे निमित्त विशेष भक्ती कार्यक्रम



● **अहिल्यानगर । वीरभूमी** –

अहमदनगर पहिली मंडळी (काँग्रीगेशनल) ह्युम मेमोरियल चर्चच्या वतीने गुड फ्रायडे (उत्तम शुक्रवार) निमित्त विशेष भक्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या भक्तीचे सूत्रसंचालन मंडळींचे आचार्य रेव्ह. डॉ. सनी पी. मिसाळ यांनी केले. यावेळी कोल्हापूर चर्च कौन्सिलचे रेव्ह. श्रीकांत बी. पठाणे यांनी प्रार्थना व उपदेश करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास मंडळीचे सेक्रेटरी नंद प्रकाश शिंदे, खजिनदार प्रकाश सूर्यवंशी, अमोल काळे, सागर घोडके यांच्यासह विश्वस्त मंडळी व तरुण संघ व ख्रिस्त बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाविकास आघाडीमध्ये फूट?: संजय राऊत

● **जळगाव । वीरभूमी** –

राहुरी आणि बारामती विधानसभा मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुका लढण्याचा काँग्रेसने निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर महाविकास आघाडीमध्ये फूट पडल्याचे चित्र आहे. काँग्रेसच्या निर्णयानंतर उद्धव सेनेचे खासदार संजय राऊत यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. काँग्रेस हा पक्ष बिहार, पश्चिम बंगाल, नागालँड असेल अशा सगळ्या ठिकाणी निवडणूक लढण्यासाठी पुढे जातो आणि निकाल लागल्यानंतर कळतं की आपण कुठे आहोत. ते कुठे आहेत? ज्या ठिकाणी ज्या पक्षाची ताकद आहे; त्या ठिकाणी त्या पक्षाने लढावे, हा महाविकास आघाडीचा एक आधार आहे.

या दोन्ही जागांसंदर्भात महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते बसून निर्णय घेतील आणि तो घ्यावा लागेल. राहुरीमध्ये लढण्याची आमच्याही कार्यकर्त्यांची इच्छा आहे. पण भाजपला मदत होईल, अशी भूमिका कुणी घेऊ नये, असा महाविकास आघाडीचा निर्णय आहे अशी प्रतिक्रिया खासदार संजय राऊत जळगावात पत्रकार परिषदेत दिली. संजय राऊत म्हणाले की राहुरी आणि बारामतीमध्ये आता पोटनिवडणूक होत आहे. आमचा प्रयत्न आहे की, या निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणूनच निर्णय घेतला पाहिजे. राहुरीमध्ये या आधीची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्राजक्त तनपुरे यांनी चांगल्या पद्धतीने लढवली होती. आता मला नक्की माहिती नाही पण, त्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा अधिकार आहे.

काँग्रेस हा पक्ष बिहार, पश्चिम बंगाल, नागालँड असेल अशा सगळ्या ठिकाणी निवडणूक लढण्यासाठी पुढे जातो आणि निकाल लागल्यानंतर कळतं की आपण कुठे आहोत. ते कुठे आहेत? ज्या ठिकाणी ज्या पक्षाची ताकद आहे; त्या ठिकाणी त्या पक्षाने लढावं, हा महाविकास आघाडीचा एक आधार आहे त्यामुळे राहुरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची ताकद असल्यामुळे त्या ठिकाणी महाविकास आघाडीचे तिन्ही घटक पक्षांना बसून निर्णय घ्यावा लागेल. बारामतीमध्ये अजित पवार यांच्या मृत्यूनंतर एक कौटुंबिक धर्म म्हणून कदाचित शरद पवारांचा पक्ष निवडणूक लढणार नाही. पण त्या ठिकाणी जर कोणी इतर लढत असतील तर त्यांना आपण विरोध करता कामा नये. राहुरी आणि बारामती या दोन्ही जागांसंदर्भात महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे प्रमुख नेते बसून निर्णय घेतील आणि तो घ्यावा लागेल. राहुरीमध्ये लढण्याची आमच्याही कार्यकर्त्यांची इच्छा आहे. पण भाजपला मदत होईल, अशी भूमिका कुणी घेऊ नये, असा महाविकास आघाडीचा निर्णय आहे.

## राहुरी, बारामतीत काँग्रेस उमेदवार देणार : हर्षवर्धन सपकाळ यांची माहिती

● **मुंबई । वीरभूमी** –

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने मोठा राजकीय निर्णय घेतला आहे. दोन्ही मतदारसंघात निवडणूक लढवण्याचा निर्धार पक्षाने केला असून पक्षश्रेष्ठींकडून यासाठी हिरवा कंदील मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

राज्यातील बारामती आणि राहुरी या महत्त्वाच्या विधानसभा मतदारसंघांमध्ये होणाऱ्या पोटनिवडणुकांकडे सर्वांचे लक्ष लागलेले असताना काँग्रेसने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. पक्षाने या दोन्ही जागांवर उमेदवार देण्याचा निर्णय घेतला असून यासाठी स्थानिक पातळीवरील परिस्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. बारामतीत संभाव्य उमेदवारांच्या मुलाखती नुकत्याच पार पडल्या असून इच्छुकांची संख्या मोठी असल्याने अंतिम उमेदवार निवडताना पक्ष नेतृत्व काळजीपूर्वक निर्णय घेणार असल्याचे सांगितले जात आहे. राहुरी मतदारसंघातही उमेदवार निश्चितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

दोन्ही ठिकाणी उमेदवारांची नावे जाहीर करण्यापूर्वी मित्रपक्षांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. महाविकास आघाडीतील जागावाटप आणि रणनीती यावरही या निर्णयाचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत राजकीय घडामोडींना वेग येण्याचे संकेत मिळत आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. त्यांनी सांगितले की, पक्षश्रेष्ठींशी चर्चा करूनच हा निर्णय घेण्यात आला आहे. बारामतीसाठी सहा अर्ज तर राहुरीसाठी चार अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच, इच्छुक उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखतीही पार पडल्या आहेत. येत्या दोन दिवसांत निवडणुकीबाबत अधिकृत भूमिका जाहीर करण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले होते. आज समोर आलेल्या माहितीनुसार काँग्रेसने दोन्ही मतदारसंघात उमेदवार देण्याचा निर्णय निश्चित केला आहे. उमेदवार निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, आज दिवसभरात ती पूर्ण केली जाणार आहे. त्यानंतर उद्या माध्यमांसमोर अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याचे सपकाळ यांनी सांगितले आहे.

# समतातील सर्व व्यवहार पारदर्शी व कायदेशीर, संशयतांचे खाती गोठवली

## संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांची पत्रकार परिषदेत माहिती । कोणत्याही प्रकारच्या अफवांना किंवा चुकीच्या बातम्यांना बळी पडू नये

● **कोपरगाव । वीरभूमी** –

समता पतसंस्थेचे व्यवहार पूर्णपणे पारदर्शी व कायद्याच्या चौकटीत असून कोणत्याही प्रकारच्या अफवांना किंवा चुकीच्या बातम्यांना बळी पडू नये, असे आवाहन संस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी कोपरगाव येथे संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत केले. संस्थेची ग्राहक संख्या एक लाख दहा हजार इतकी असून वार्षिक उलाढाल सुमारे दोन हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. गेल्या चाळीस वर्षांपासून संस्थेने विश्वासार्हता आणि शिस्तबद्ध कारभार कायम राखला असून यापुढेही त्याच परंपरेने काम सुरू राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी सरव्यवस्थापक सचिन भट्टड उपस्थित होते.

संदीप कोयटे म्हणाले की, संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रभर विस्तारलेले असल्यामुळे कुणीही खाते उघडून व्यवहार करू शकतो. कॅप्टन अशोक खरात यांच्याशी संबंधित सर्व खाती कायदेशीर पूर्तता करूनच उघडण्यात आली आहेत. त्या खात्यांद्वारे झालेले व्यवहारही नियमांनुसारच झाले आहेत. शिर्डी पोलिसांनी पत्राद्वारे मागवलेली सर्व माहिती अवघ्या दोन तासांत सादर करण्यात आली असून त्यांच्या सूचनेनुसार संबंधित खाती तात्काळ गोठवण्यात आली आहेत. यावरून संस्थेची प्रशासनाशी असलेली पारदर्शकता आणि सहकार्याची भूमिका स्पष्ट होते.

संस्थेच्या ठेवीदारांच्या सुरक्षेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, ९९ टक्के खातेदारांची साठ लाख रुपयांपर्यंतची रक्कम 'लिक्विडिटी बेस्ट प्रोटेक्शन स्कीम' अंतर्गत सुरक्षित आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची घाबरण्याची गरज नसून समता पतसंस्था ही देशातील एक विश्वासार्ह आणि सक्षम संस्था म्हणून ओळखली जाते.




खरात यांच्या आर्थिक व्यवहारांबाबत पोलिसांकडून गोपनीयता राखण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तपासात कोणताही अडथळा येऊ नये यासाठी संस्थेकडून त्या सूचनांचे काटेकोर पालन केले जात आहे. एक लाखाहून अधिक खातेदारांमध्ये एखाद्या खात्याची उलाढाल वेगळी ओळखणे सहज शक्य नसते, मात्र संबंधित सर्व व्यवहार व कागदपत्रे नियमबद्ध आहेत. मे २०२१ ते जानेवारी २०२६ या कालावधीत हे व्यवहार झाले असून सध्या संबंधित चार खात्यांमध्ये सुमारे तीस लाख रुपयांची रक्कम शिल्लक आहे. कोणतेही खाते बनावट नसून निधीचा उगम व व्यवहारांचा तपशील पोलीस तपासातूनच स्पष्ट होईल. बहुतेक व्यवहार ऑनलाइन पद्धतीने झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

### सर्व व्यवहार कायद्याच्या चौकटीत

■ एक लाख दहा हजार खातेदारांचा विश्वास अबाधित असून 'लिक्विडिटी बेस्ट प्रोटेक्शन'मुळे समताच्या ठेवींना सुरक्षितता प्राप्त झाली आहे. समता पतसंस्थेबाबत काही माध्यमांमध्ये चुकीच्या व विपर्यस्त बातम्या प्रसिद्ध झाल्याने संस्थेची अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यासाठी ही पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. माध्यम प्रतिनिधींनी वस्तुनिष्ठ आणि जबाबदारीने वार्तांकन करावे, तसेच संस्थेच्या एक लाख दहा हजार खातेदारांच्या हिताचा विचार करावा, असे आवाहन करण्यात आले. समता पतसंस्थेचे सर्व व्यवहार कायद्याच्या चौकटीत, पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीनेच सुरू असल्याचा पुनरुच्चार यावेळी करण्यात आला.

## SPOT NEWS



### नाईक पुतळा ते उपजिल्हा रुग्णालय या मार्गाला महात्मा बसवेश्वर मार्ग फलक लावा

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शहरातील कै.वसंतराव नाईक पुतळा ते उपजिल्हा रुग्णालय या मार्गाला महात्मा बसवेश्वर मार्ग बाबतचा फलक आकर्षक पद्धतीने लावावा अशी मागणी पाथर्डी तालुका वीरशैव लिंगायत समाजाचे वतीने पाथर्डी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदन देत करण्यात आली. याबाबत अधिक माहिती देताना लिंगायत संघर्ष समितीने सांगितले की, सन २०१५-१६ मध्ये पाथर्डी तालुक्यातील समस्त वीरशैव लिंगायत समाजाचे वतीने मागणी केल्यानुसार नगरपरिषदचे वतीने ठराव घेऊन तत्कालीन मुख्याधिकारी व पदाधिकारी यांचे हस्ते या मार्गाचे महात्मा बसवेश्वर मार्ग असे नामकरण करण्यात आले. नगरपरिषदेच्या वतीने स्व. वसंतराव नाईक पुतळा येथे त्याबाबतचा आकर्षक मार्गफलक ही लावण्यात आलेला होता परंतु चौकात रुंदीकरणाचे काम चालु असताना हा नामफलक काढण्यात आला आहे. येत्या अक्षय तृतीयेला महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती दिनी वरील मार्गाला असलेला मार्गफलक बनवून तो पुनर्स्थापित करण्यात यावा अशी मागणी सकल लिंगायत समाज व महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समिती, पाथर्डीचे वतीने करण्यात आली आहे. यावर मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी या मार्गावर श्री महात्मा बसवेश्वर यांचे नावाचा चांगला मार्गफलक पुन्हा लावण्यात येईल असे आश्वासन दिले. यावेळी सुहास शेळगावकर, तालुकाध्यक्ष सचिन फुटाणे, सौ. रेणुका फुलशेटे, पुरुषोत्तम इजारे, अभिजित गुजर, गजानन तारापुरे, संतोष बुरसे, सुरेश इजारे, दत्ताभाऊ इजारे आदी उपस्थित होते.

### प्रशासकीय यंत्रणा व वितरकांनी समन्वय ठेवून

# गॅस वितरणाचे योग्य नियोजन करा : आ. आशुतोष काळे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

पश्चिम आशियायी देशात सुरु असलेल्या युद्धाचा ताण संपूर्ण देशातील इंधन वितरण व्यवस्थेवर जाणवत असून कोपरगाव तालुक्यामध्ये देखील व्यावसायिक आणि घरगुती गॅस सिलेंडरचा काही अंशी तुटवडा निर्माण झाला आहे. याचा परिणाम थेट सामान्य नागरिकांवर आणि छोट्यामोठया व्यावसायिकांवर पडत आहे. हि तात्पुरती टंचाई असून इतर देशांच्या तुलनेत केंद्र व राज्य सरकारच्या योग्य निर्णय व घेतलेल्या धोरणांमुळे देशात व राज्यात परिस्थिती अतिशय चांगली आहे. तरीदेखील सर्वसामान्य नागरिकांना व छोट्या मोठ्या व्यवसायिकांना अडचणींचा सामना करावा लागणार नाही यासाठी प्रशासकीय यंत्रणा आणि गॅस एजन्सी व वितरीकांनी समन्वय ठेवून गॅस वितरणाचे योग्य नियोजन करावे अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी दिल्या आहेत.



पश्चिम आशियात सुरु असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाई व कोपरगाव तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर आ. आशुतोष काळे यांनी तहसील कार्यालयात शासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याची झळ थेट सामान्य नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचली आहे. या गंभीर परिस्थितीमुळे नागरिकांमध्ये गॅस मिळेल की, नाही? या भीतीपोटी वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध व्हावा यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर गॅसचे बुकिंग करण्यासाठी एजन्सीला संपर्क करतात. त्यावेळी एजन्सी चालकांनी आपल्या अडचणींचा राग गॅस ग्राहकांवर न काढता ग्राहकांना व्यवस्थित समजून सांगा. ही परिस्थिती हाताळण्यासाठी गॅस एजन्सींनी अत्यंत संयमाने आणि पारदर्शकपणे काम करणे गरजेचे असून प्रत्येक एजन्सीने आपल्या कार्यालयात एका जबाबदार व्यक्तीची नियुक्ती करावी. जेणेकरून ग्राहकांनी विचारलेल्या प्रश्नाला योग्य प्रतिसाद देऊन त्यांच्या अडचणी समजून घेतल्या जातील. तसेच डिलिव्हरी बॉईजनी देखील आपले मोबाईल फोन चालू ठेवून ग्राहकांशी सौजन्याने संवाद साधावा. गॅस वितरण व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा काळाबाजार, वशिलेबाजी आणि गॅस वितरणाचा गोंधळ सहन केला जाणार नाही. नागरिकांना वेळेवर गॅस पुरवठा झाला पाहिजे काही अडचणी आल्या तर थेट माझ्याशी संपर्क साधा मात्र नागरीकांना अडचणी येता कामा नये अशा स्पष्ट सूचना आ.आशुतोष काळे यांनी गॅस एजन्सीच्या प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिल्या आहे.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, पुरवठा अधिकारी देविदास फोपसे, श्रीमती आदिती भालेराव, नितीन चौधरी, दिपक गरुड, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, नगरसेवक शैलेश साबळे, जनार्दन कदम, राहुल शिरसाठ, संदिप कपिले, इम्तियाज अत्तार, बाळासाहेब रुईकर, सोमनाथ आढाव, विजय त्रिभुवन, माजी नगरसेवक फकिर कुरेशी, रमेश गवळी, कोकमठाणचे उपसरपंच दिपक रोहोम, सचिन गवारे, जुनेद शेख, अमित आगलावे, अर्जुन मरसाळे, मयुर शिंदे, अमजद शेख, मधुकर रोहोम, लक्ष्मण सताळे, योगेश कानडे, आण्णा जाधव, गॅस एजन्सीचे संचालक विसपुते, विशाल जगताप, बाबासाहेब परजणे, रविंद्र वाघमारे, शिवाजी अडसुरे आदींसह मतदार संघातील नागरिक उपस्थित होते.

### पुरवठा विभाग व रेशन दुकानदारांना अल्टीमेटम

■ शासनाकडून रेशनकार्ड धारकांना होत असलेल्या मोफत धान्य पुरवठ्यापासून रेशन दुकानदारांनी एकाही रेशनकार्ड धारकाला वंचित ठेवू नये. ज्या रेशनकार्ड धारकांची रेशन दुकानदारांकडून अडवणूक केली जात असेल अशा नागरिकांनी माझ्याशी संपर्क साधावा. रेशनकार्ड धारकांची अडवणूक करणाऱ्या रेशन दुकानदारांची किंवा अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही असा ईशारा आ. आशुतोष काळे यांनी यावेळी पुरवठा विभागाचे अधिकारी व रेशन दुकानदारांना दिला.

> कोपरगाव तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. उभ्या पिकांचे, फळबागांचे व भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर महसूल व कृषी विभागाने तात्काळ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे पूर्ण करावेत आणि झालेल्या नुकसानीचा अचूक अहवाल शासनाकडे सादर करावा. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळवून देण्याचा माझा पुरेपूर प्रयत्न राहील. एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेवून प्रशासनाने संवेदनशीलतेने व तत्परतेने पंचनामे पूर्ण करावे.
>
> **– आ. आशुतोष काळे**

### सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रतिभा खैरनार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**



छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सहावे राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी महिला साहित्यिक प्रतिभा खैरनार यांची निवड करण्यात आली. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने निमगाव वाघा (ता. नगर) येथे रविवार, दि. १७ मे रोजी होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच संयोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत खैरनार यांची निवड करण्यात आली. या बैठकीसाठी ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व संमेलनाचे मुख्य संयोजक पै. नाना डोंगरे, गणराज प्रकाशनचे प्रा. गणेश भगत, कवयित्री सरोज आल्हाट, बाळासाहेब देशमुख, भाऊसाहेब कदम, कवी गीताराम नरवडे, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, निवृत्ती महाराज कानवडे, राजेंद्र घोडके, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, बाळासाहेब मुनतोडे आदी उपस्थित होते. प्रतिभा खैरनार या नांदगाव (जि. नाशिक) येथील साहित्यिका असून, त्यांचे विविध काव्यसंग्रह व कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

## चिंचोली येथील मळाई-मळगंगा देवीचा ९ एप्रिल रोजी यात्रोत्सव

**● पारनेर । वीरभूमी–**

चिंचोली (ता. पारनेर) येथील श्री मळाई वडजाई मळगंगा देवीच्या चैत्र यात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरु असून, ही यात्रा गुरुवारी ९ एप्रिल पासून प्रारंभ होत असल्याची माहिती देवस्थान चे सचिव आनंदराव पिंपरकर यांनी दिली. देवीची हळद लावण्याच्या विधीने २ एप्रिल रोजी प्रारंभ झाला.यात्रेनिमित्त महिलांमध्ये विशेष उत्साह असून, विविध धार्मिक कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे.



पारनेर तालुक्यातील चिंचोली येथे मळगंगा मळाई देवीचे पुरातन मंदिर आहे. राज्यातील लाखो भाविकांचे कुलदैवत असून यात्रेनिमित्त राज्यभरातील भाविक मोठ्या प्रमाणावर येतात.यात्रोत्सवाच्या पूर्वसंध्येला, गुरूवार ९ एप्रिल रोजी पहाटे गावतून मोठ्या भक्तिभावाने पालखी मिरवणूक निघणार आहे. या मिरवणुकीत भक्तगण दंडवत घालून सहभागी होतील. त्यानंतर दिवसभर मंदिरात महाप्रसाद व अवघ्या महाराष्ट्रातून आलेल्या भाविकांच्या सहभागाने विविध धार्मिक विधी होतील.

पंचकोशीतील भाविक आपल्या कुलदैवताच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी मंदिरात गर्दी करतील. दुपारी मानाच्या पालखीसोबत पूजन व मिरवणूक आयोजित करण्यात आली आहे. यानंतर देवीला खास नैवेद्य अर्पण करण्यात येईल.

शुक्रवार १० एप्रिल रोजी भव्य बैलांचा शर्यतीचा कार्यक्रम होणार आहे. यात्रेला मोठा इतिहास लाभलेला असून, या यात्रेचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन देवस्थान समिती, चिंचोली ग्रामस्थ, मुंबईकर मित्र मंडळ यांनी केले आहे.

## पाथर्डी तालुक्याच्या पूर्व भागात वादळी वाऱ्यासह गारपिटीचा तडाखा; पिकांचे मोठे नुकसान

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरासह तालुक्यातील पुर्व भागात चिंचपूर पांगुळ, खरवंडी, टाकळी मानुर, येळी परिसरात दोन दिवसांपासून अचानक हवामानात बदल होऊन जोरदार वादळी वारा आणि गारांसह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून चिंचपूर पांगुळ, पिंपळगाव तप्पा, मानेवाडी, वडगांव, ढाकणवाडी, जोगेवाडी परिसरात विजांच्या कडकडाटाने तसेच झालेल्या गारपिटीमुळे भीतीचे वातावरण पसरले होते. दुपारच्या सुमारास अचानक आकाश काळ्या ढगांनी व्यापून गेले आणि विजांच्या भयंकर कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की अनेक ठिकाणची झाडे उन्मळून पडली आहेत. या अनपेक्षित संकटामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली.



शेतात चरायला गेलेली जनावरे या पावसात अक्षरशः झोडपून निघाली. गारपिटीमुळे उभ्या पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले असून, काढणीला आलेल्या पिकांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे. ओढे आणि नाले तुडुंब भरून वाहिले.

विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मानेवाडी येथील सावळेराम सकुंडे यांच्या घरावरील पत्रे उडाल्याने त्यांच्या पत्नी रखमाबाई सकुंडे गंभीर जखमी झालेल्या आहेत. त्यांना पाथर्डी येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते तर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्यात आले आहे. अचानक आलेल्या या संकटामुळे चिंचपूर पांगुळ परिसरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले होते.

# दानशूर व्यक्तींच्या मदतीने शहाजापूर वनक्षेत्रातील पाणवठे जीवनदायी

**● पारनेर । वीरभूमी–**

निसर्गाचा कोप आणि सूर्याची आग ओकणारी दाहकता वाढू लागली की, मानवासोबतच निसर्गातील वन्यजीवांचीही मोठी घालमेल होते. सध्या उन्हाची तीव्रता वाढत असून नैसर्गिक जलस्त्रोत आटले आहेत. अशा कठीण काळात शहाजापूर वनविभागातील वन्यप्राण्यांसाठी 'माणुसकी' धावून आली आहे. सामाजिक कार्यकर्ते राहुल सोनुळे आणि विजय साबळे यांनी स्वखर्चाने पाणवठ्यात पाणी सोडून या मुक्या जीवांची तहान भागवत एक नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

शहाजापूर, सुपा आणि हंगा या तीन गावांच्या सीमेवर निसर्गरम्य आणि मोठे वनक्षेत्र विस्तारलेले आहे. या भागात विविध प्रकारचे पक्षी आणि वन्यप्राण्यांचा मोठा वावर असतो. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात निसर्ग साथ देतो, मात्र जानेवारी ते जून या सहा महिन्यांच्या काळात निसर्गाची कूस कोरडी पडते. पाण्यासाठी या जीवांना वणवण भटकावे लागते. हीच अडचण ओळखून वनविभागाने येथे कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत, जे आता दानशूर व्यक्तींच्या मदतीने 'जीवनदायी' ठरत आहेत.

मागील काही दिवसांत सुपा येथील 'प्रेक्षा मेडिकल'चे संचालक श्री. राहुल सोनुळे आणि 'गुरु मोटर ड्रायव्हिंग स्कूल'चे संचालक विजय साबळे यांनी टँकरद्वारे या पाणवठ्यांमध्ये पाणी सोडले. विशेष म्हणजे, सुपा गावचे सरपंच योगेशशेठ रोकडे हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने या उपक्रमात पुढाकार घेत आहेत. त्यांना सुप्यातील पाणीपुरवठादार पप्पूशेठ पवार यांची मोलाची साथ लाभत असून, ते 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर तात्काळ पाणी टँकर उपलब्ध करून देत आहेत.वाढत्या उन्हामुळे वन्यजीवांचे हाल होत आहेत. समाजातील दानशूर व्यक्तींनी आपल्या प्रियजनांच्या स्मृतीप्रत्यर्थ या पाणवठ्यात पाणी सोडावे आणि पक्षांसाठी धान्य उपलब्ध करून द्यावे.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS



## कोळगाव ग्रामस्थांकडून तारकेश्वर गडावरील गो-शाळेला चारा भेट

**शेवगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील कोळगाव येथील शंभुराजे मित्र मंडळ, मनोजदादा जरांगे पाटील मित्र मंडळ व सकल मराठा समाज यांच्यावतीने श्रीक्षेत्र तारकेश्वर गडाचे महंत ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली तारकेश्वर गडावरील गोशाळेसाठी एकदिवसाचा मका चारा भेट म्हणुन देण्यात आला. गोशाळेसाठी देण्यात आलेल्या चाऱ्यासाठी सरासरी प्रत्येक कुटुंबाकडून सुमारे १०० रुपयांप्रमाणे देणगी जमा करण्यात आली, तसेच अनेकांनी मनाप्रमाणे रोख स्वरूपातही मदत केली. हा सामाजिक उपक्रम यशस्वीतेसाठी राहुलदादा झिरपे, नितीन झिरपे, महेश लक्ष्मण झिरपे, बबन झिरपे, विठ्ठल वाघ, किशोर झिरपे, पिंटू झिरपे, संकेत झिरपे, बाळू विष्णु झिरपे, महेश झिरपे, प्रवीण अंबादास खंडागळे, सौरव वाघ, विशाल राजू झिरपे, राजेंद्र झिरपे, संदीप वाघ, विशाल कोरडे, अभिमान मरकड, शुभम झिरपे, भैय्या हनुमान झिरपे, प्रशांत पुंडलिक झिरपे, हरी गोरख झिरपे, गोविंदा झिरपे आदीसह ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामस्थांच्या या एकजुटीमुळे सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण निर्माण झाले असून, अशा उपक्रमांमुळे समाजात एकोपा आणि सेवाभाव अधिक दृढ होत असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

## नगर जिल्ह्यात काँग्रेसचे 'संघटन सृजन अभियान सुरु

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर जिल्ह्यात व्यापक 'संघटन सृजन अभियान' राबविण्यात येत असून हे अभियान १९ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. या अभियानाच्या पार्श्वभूमीवर मे महिन्यात जिल्ह्यात नव्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती पक्ष निरीक्षक शरद राऊटं यांनी दिली. या वेळी मुंबईचे निरीक्षक मुजफ्फर हुसेन, शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी जिल्हाध्यक्ष करण ससाणे, शहर ब्लॉक अध्यक्ष फिरोज खान, प्रताप शेळके, संपतराव म्हस्के, उपाध्यक्ष बाळासाहेब भंडारी, अण्णासाहेब डावखर, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष मोहसीन शेख यांच्यासह नगर दक्षिण काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शरद राऊटं म्हणाले की, काँग्रेस पक्षाने देशभर संघटन सुदृढ करण्यासाठी 'संघटन सृजन अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला असून त्याची सुरुवात गुजरातमधून करण्यात आली आहे. सध्या या अभियानाचा सातवा टप्पा सुरू असून पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन पक्षाविषयी त्यांची मते जाणून घेतली जात आहेत. कार्यकर्त्यांच्या अपेक्षा, आवश्यक बदल आणि संघटनात्मक सुधारणा यावर थेट चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागावर विशेष भर देत ब्लॉक कमिटी स्तरापर्यंत जाऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाणार आहे. राज्यातील निवडणुकांमुळे यापूर्वी हे अभियान राबविता आले नव्हते. मात्र आता २ एप्रिलपासून नगर जिल्ह्यात अभियानाला सुरुवात झाली असून १९ एप्रिलपर्यंत ते सुरू राहणार आहे.

# पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून पाथरे येथे पाहणी

## राहाता तालुक्यात अवकाळी पावसामुळे शेतीचे नुकसान । १०० टक्के पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश

**शिर्डी । वीरभूमी –**

अवकाळी पाऊस, गारपीट व वादळामुळे राहाता तालुक्यासह जिल्ह्यात झालेल्या शेती पिकांच्या आणि अन्य नुकसानीचे महसूल व कृषी भागाने एकत्रितपणे १०० टक्के अचूक पंचनामे करून अहवाल सादर करावेत, असे निर्देश जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाला दिले.

गुरुवारी जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडून नुकसानीची माहिती घेतली. तसेच, बाधित शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांनी मौजे पाथरे (बु.) येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.



राहाता तालुक्यातील पाथरे (बु.) येथील शेतकरी संजय भाऊसाहेब घोलप व गोपालक सोपान घोलप यांच्या शेताला व गोठ्याला पालकमंत्र्यांनी भेट दिली. वादळी वाऱ्यामुळे विजेची तार अंगावर पडून आणि विद्युत धक्का बसल्याने ९ गायी दगावल्याच्या दुर्दैवी घटनेची त्यांनी पाहणी केली. मंत्री विखे पाटील यांनी घोलप कुटुंबीयांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना धीर दिला. यावेळी 'घोलप कुटुंबीयांना सर्वतोपरी सहकार्य करून शासन स्तरावरून तातडीने मदत कशी मिळेल, यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत,' अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच, वादळाने पडलेल्या वीजवाहक तारा व विजेच्या खांबांच्या समस्या तातडीने सोडवून गावातील वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे निर्देशही वीज वितरण कंपनीला दिले.

राहाता तालुक्यात १८ मार्च, ३० मार्च व १ मार्च २०२६ रोजी झालेल्या पावसाने १ हजार ८०० हेक्टर क्षेत्रावरील सुमारे २ हजार ७५९ शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यामध्ये गहू, कांदा, द्राक्ष, मका, डाळिंब, हरभरा, टरबूज आणि आंबा या पिकांचे मोठे नुकसान झाले असल्याची माहिती पालकमंत्री श्री. विखे पाटील यांनी पाहणीनंतर दिली.

याशिवाय शेतामध्ये ठेवलेल्या उत्पादित मालाचे तसेच वाऱ्याच्या वेगाने शेडनेट व पॉलीहाऊसचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

जिल्ह्यातील अन्य तालुक्यांत झालेल्या पावसाने ४२ हजार ६१८ शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान झाले आहे. गुरुवारी पुन्हा जिल्ह्याच्या बहुतांशी भागात झालेल्या पावसाने जामखेडमध्ये १ पशुधन दगावले असून, संगमनेरमध्ये २, राहुरीत ९ आणि कोपरगावमध्ये १ घराचे नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे १०० टक्के पंचनामे करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

या पाहणी दौऱ्यावेळी शिर्डीचे उपविभागीय अधिकारी माणिक आहेर, संगमनेरचे उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे, गटविकास अधिकारी विवेक गुंड, नायब तहसीलदार हेमंत पाटील, मंडळ कृषी अधिकारी रमेश चौपडे, सहायक कृषी अधिकारी श्रीमती मीना जाधव, वीज वितरण कंपनीचे अभियंता गाडे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संपत तांबे उपस्थित होते. तसेच, बाजार समितीचे उपसभापती अण्णासाहेब कडू, सरपंच उमेश घोलप, संचालक अशोकराव घोलप, आबासाहेब घोलप, भाऊसाहेब घोलप, आप्पासाहेब दिघे यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

अजूनही काही दिवस अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला उत्पादित शेतमाल आणि जनावरे सुरक्षित स्थळी ठेवण्याबाबत शक्य तेवढे नियोजन करावे आणि संभाव्य नुकसान टाळावे, असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

## लाडक्या बहिणींना ३० एप्रिल पर्यंत ई-केवायसी करण्यासाठी मुदतवाढ : आ. आशुतोष काळे

**कोपरगाव । वीरभूमी–**

महायुती शासनाने महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांसाठी शासनाने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली होती. परंतु अनेक महिलांची ई-केवायसी काही तांत्रिक अडचणींमुळे होवू शकली नाही अशा महिलांसाठी हि मुदत ३० एप्रिल पर्यंत वाढवून देण्यात आली असून या संधीचा फायदा घेवून ई-केवायसी न केलेल्या महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी शासनाच्या नियमानुसार ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. कोपरगाव मतदारसंघातील अनेक महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे. मात्र काही महिलांकडून ह्या योजनेचे अर्ज भरतांना तांत्रिक चुका किंवा नजरचुकीने चुकीचे पर्याय निवडले तर काही महिलांची वैयक्तिक माहिती चुकीच्या पद्धतीने भरली गेली होती.

अशा काही तांत्रिक त्रुटींमुळे अनेक महिलांना माझी लाडकी बहिण योजनेचे दीड हजार रुपये मिळण्यास अडचणी येत होत्या अशा सर्व महिलांना आपली माहिती दुरुस्त करण्याची आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी या योजनेच्या पोर्टलवर महायुती शासनाने उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे ज्या महिलांना या योजनेची ई-केवयासीची प्रक्रिया पूर्ण करून करायची आहे त्या महिलांना ३० एप्रिल पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे या योजनेच्या ज्या पात्र महीलांना दीड हजार रुपये मिळत नाही त्या महिलांनी तातडीने ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असे आवाहन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे.

## आरपीआय (आंबेडकर गट) महिला पारनेर तालुकाध्यक्षपदी आरती सोनवणे यांची बिनविरोध निवड



**पारनेर । वीरभूमी–**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर गट) पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी पारनेर तालुक्यात नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिला तालुकाध्यक्षपदी आरती सोनवणे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून, युवक आघाडीच्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्याही सोपवण्यात आल्या आहेत. ही माहिती तालुकाध्यक्ष किरण सोनवणे आणि उपाध्यक्ष अजय साळवे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

महिला तालुकाध्यक्ष आरती सोनवणे (बिनविरोध निवड), युवक उप तालुकाध्यक्ष दीपक साळवे, कार्याध्यक्ष (युवक) राजेश सांगवे, पानोली शहराध्यक्ष विशाल साळवे यांच्या निवडी करण्यात आल्या. या निवडीमुळे पारनेर तालुक्यात पक्षाच्या कार्याला नवीन गती मिळणार असून, विशेषतः महिला आणि युवकांचे संघटन वाढवण्यावर भर दिला जाणार असल्याचे किरण सोनवणे यांनी सांगितले.

या निवडी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपकभाऊ निकाळजे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा सुनीता चव्हाण, प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब पवार यांच्या सूचनेनुसार करण्यात आल्या आहेत. या निवडीला उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष शशी दारोळे, अहमदनगर जिल्हाध्यक्ष मकासारे आणि युवक जिल्हाध्यक्ष रॉकी लोंढे यांनी विशेष पाठबळ दिले आहे. निवडीच्या प्रसंगी नगर शहराध्यक्ष हरीश अल्हाट, युवक शहराध्यक्ष संदीप वाघमारे यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# काका कोयटे यांच्या सहकार ध्यासाला महाडिक कुटुंबीयांची ताकद

## महिला पतसंस्था चळवळीला नवी दिशा

**कोपरगाव । वीरभूमी–**

सहकारी पतसंस्था चळवळ सक्षम करण्यासाठी काका कोयटे यांनी आयुष्य वाहून घेतले असून त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रातील सहकार चळवळीला बळ मिळाले आहे. ही चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून महाडिक कुटुंबीय निश्चितपणे प्रयत्न करतील, असे प्रतिपादन राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांनी केले. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित कोल्हापूर येथील राज्यस्तरीय सहकारी पतसंस्था चळवळीतील महिला मेळाव्यात ते बोलत होते.

काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळ अधिक बळकट होत असून सर्वसामान्य नागरिकांचा पतसंस्थांवरील विश्वास त्यांच्या प्रयत्नांमुळे वृद्धिंगत होत आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक प्रलंबित प्रश्न सरकारी दरबारी मार्गी लागले आहेत. या चळवळीला अधिक बळ देण्यासाठी महाडिक कुटुंबीयही सक्रियपणे सहभागी होणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच खासदार धनंजय महाडिक यांच्या माध्यमातून पतसंस्थांचे प्रश्न दिल्लीपातळीवर मांडले जाणार असून सहकार क्षेत्राला न्याय मिळवून देण्यासाठी ठोस प्रयत्न केले जातील, असे आश्वासन सौ. अनुराधाताई महाडिक यांनी आपल्या भाषणादरम्यान दिले.

या मेळाव्यात सौ.अरुंधतीताई महाडिक यांची महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या महिला विभागाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कृष्णराज महाडिक यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सहकारी पतसंस्थांच्या कायद्यात महिलांसाठी आवश्यक बदलांविषयी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी सौ. अरुंधती धनंजय महाडिक होत्या. व्यासपीठावर नांदेड येथील गोदावरी अर्बनच्या सौ. राजश्रीताई पाटील, राज्य फेडरेशनच्या उपकार्याध्यक्षा अंजलीताई पाटील, पुनम चव्हाण तसेच क्रांतीताई शितोळे उपस्थित होत्या.

खासदार धनंजयराव महाडिक यांनी यावेळी सांगितले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सहकार क्षेत्रातील बदलांसाठी नेमलेल्या समितीवर सदस्य म्हणून काम करताना राज्यातील पतसंस्थांच्या समस्या व सूचना प्रभावीपणे मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.



तर नवनियुक्त राज्य फेडरेशन महिला विभागाच्या अध्यक्ष सौ. अरुंधतीताई महाडिक म्हणाल्या की, काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी पतसंस्था चळवळीला नवे बळ मिळत आहे. या चळवळीला महिलांची अधिक साथ मिळावी यासाठी राज्यभर महिला पतसंस्थांचे जाळे मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असून काका कोयटे यांच्या कार्याला पूर्ण पाठिंबा देणार आहे.

# राहुरी पोटनिवडणुकीत सकारात्मकतेने लढा देण्याचे विखे पाटील यांचे आवाहन

## स्व. शिवाजीराव कर्डीले यांच्या स्वप्नपूर्तीसाठी महायुतीचा निर्धार । ६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल

**● अहील्यानगर । वीरभूमी–** राहुरी विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक ही स्व. शिवाजीराव कर्डीले यांच्या आठवणींना उजाळा देणारी आहे. जनता महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभी असली तरी प्रत्येक कार्यकर्त्याने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून मतदारांपर्यंत पोहोचण्याची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. सोमवार, ६ एप्रिल रोजी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी आ. मोनिका राजळे, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, उमेदवार अक्षय कर्डीले, सुरसिंग पवार, नामदेव ढोकणे, आरपीआयचे सुरेंद्र थोरात, काशिनाथ लवांडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. साकळाई योजनेसाठी १२३४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वतीने मंत्री विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात मंत्री विखे पाटील म्हणाले की, राहुरी मतदारसंघाच्या विकासासाठी स्व. शिवाजीराव कर्डीले यांनी मोठी धडपड केली होती. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने ही निवडणूक महत्त्वाची आहे. त्यामुळे एकमेकांविषयी गावात हेवेदावे न करता सकारात्मक दृष्टीकोन ठेवून निवडणुकीला सामोरे जाणे गरजेचे आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश सर्व क्षेत्रांत प्रगती करत आहे. कोविड संकटानंतर जागतिक अस्थिरतेच्या परिस्थितीतही देश यशस्वी वाटचाल करत आहे, हे त्यांच्या धोरणांचे यश असल्याचे त्यांनी नमूद केले. इंधन व गॅस टंचाईच्या मुद्द्यावरून सरकारला बदनाम करण्याच्या प्रयत्नांना कार्यकर्त्यांनी ठोस उत्तर द्यावे, असेही त्यांनी सांगितले.



विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्याची भूमिका महत्त्वाची ठरणार असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकार घेत असलेले निर्णय महत्त्वाचे आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती प्रचारादरम्यान मतदारांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.

महायुती सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत आहे. वांबोरी चारी साकळाई योजनेच्या माध्यमातून स्व. शिवाजीराव कर्डीले यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी घेतलेले निर्णय महत्त्वपूर्ण आहेत. वर्षानुवर्षे दुष्काळ पाहिलेल्या भागाला पाणी देण्याचे काम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होत असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात राहुरी तालुक्यात औद्योगिक विकास घडवून रोजगारनिर्मिती करण्याच्या दृष्टीनेही काम केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आ. मोनिका राजळे यांनी आपल्या भाषणात स्व. कर्डीले यांच्या कार्याचा गौरव करत प्रत्येक कार्यकर्त्याने स्वतःला अक्षय कर्डीले समजून निवडणुकीत उतरावे, असे आवाहन केले. साकळाई योजनेचा निर्णय हा दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा असून निवडणुकीसाठी शुभसंकेत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सुभाष पाटील, दिलीप भालसिंग व अक्षय कर्डीले यांचीही भाषणे झाली.

### त्यांनी संगमनेरकडे लक्ष द्यायला हवे होते

■ काँग्रेस पक्षाने राहुरी विधानसभा निवडणूक लढवण्याचा घेतलेल्या निर्णयावर प्रतिक्रिया देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, महायुतीचा विजय निश्चित आहे. बाळासाहेब थोरात यांनी राहुरीपेक्षा संगमनेर निवडणुकीकडे अधिक गांभीर्याने लक्ष द्यायला हवे होते. अशोक खरात प्रकरणाबाबत थोरातांनी केलेल्या वक्तव्याचा समाचार घेताना त्यांनी सूचकपणे म्हटले की, या प्रकरणाची पाळेमुळे शिर्डीत की संगमनेरमध्ये आहेत, हे चौकशी समितीतून स्पष्ट होईल.

---

# श्रीक्षेत्र अमरापूर येथे श्री रेणुकामाता जन्मोत्सवाची धामधूम

## चैत्र कृष्ण पंचमीला विविध धार्मिक कार्यक्रम

**● शेवगाव । वीरभूमी –** माहूरगड निवासिनी श्री रेणुकामाता यांचे ठाणे असलेल्या श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात मंगळवार (दि. ७) चैत्र कृष्ण पंचमी निमित्त श्री रेणुकामातेचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात येणार असून, त्या निमित्त देवस्थानात सध्या उत्साहाचे वातावरण असून तयारीची धामधूम सुरू आहे.



मंगळवारी प्रातःसमयी आईसाहेबांना दुग्धाभिषेक घालून भरजरी शालू व सुवर्णालंकारांनी मातेचा आकर्षक श्रृंगार करण्यात येणार आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात विद्युत रोशनाईऐवजी असंख्य तेल-तुपाचे दिवे लावून पारंपरिक झगमगाट करण्यात येणार आहे. सकाळी साडेअकरा वाजता महाआरती झाल्यानंतर मिरवणूक काढण्यात येईल. सुहासिनी व महिला भजनी मंडळांच्या उपस्थितीत विधीवत आईसाहेबांचा जन्मोत्सव साजरा केला जाणार आहे.

या सोहळ्यात श्री रेणुकामाता मल्टीस्टेटचे प्रवर्तक व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव हे पूजेला बसणार असून वे. शा. सं. सच्चिदानंद देवा देशपांडे, तुषार देवा व इतर ब्रह्मवृंद पौरोहित्य करणार आहेत.

आई साहेबांच्या जन्मोत्सवासाठी पंचक्रोशीतील भाविक दिवसभर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने देवस्थानच्या वतीने भक्तनिवासात दिवसभर महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री रेणुकामाता भक्तानुरागी मंगलताई भालेराव यांनी केले आहे.

---

# वडझिरे येथे बांधकाम कामगारांसाठी भव्य मोफत आरोग्य शिबिर उत्साहात

**● पारनेर । वीरभूमी –** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने पारनेर तालुक्यातील वडझिरे येथे बांधकाम कामगारांसाठी भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात गावातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष बांधकाम कामगारांनी सहभाग नोंदवून आपल्या आरोग्याची मोफत तपासणी करून घेतली.



दिवसभर चाललेल्या या शिबिरात कामगारांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, विशेषतः लिव्हर (यकृत) तपासणी आणि इतर आवश्यक चाचण्या करण्यात आल्या. केवळ तपासणीच नव्हे, तर गरजू कामगारांना मोफत औषधांचे वाटपही करण्यात आले. साधारणपणे ७० ते ८० कामगारांनी या वैद्यकीय सेवेचा प्रत्यक्ष लाभ घेतला. बांधकाम क्षेत्रात काम करताना होणारी शारीरिक झीज आणि आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष लक्षात घेता, हे शिबिर कामगारांसाठी अत्यंत दिलासादायक ठरले.या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके नियोजन रेश्मा मणियार यांनी केले होते. गावोगावी पोहोचून शेवटच्या कामगाराला वैद्यकीय सुविधा मिळवून देणे हे ध्येय समोर ठेवून त्या कार्यरत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

याप्रसंगी आरोग्य विभागाची तज्ज्ञ टीम उपस्थित होती. यावेळी सविता आढाव (जिल्हा समन्वय अधिकारी, बांधकाम कामगार, आरोग्य विभाग, डॉ. तेजल गाडेकर, सुवर्णा, कुसुम, गायत्री व रोहित (वैद्यकीय पथक) या टीमने अत्यंत तत्परतेने कामगारांची तपासणी करून त्यांना आरोग्याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. बांधकाम कामगार हा समाजाचा असा घटक आहे जो इतरांसाठी घरे आणि इमारती उभा करतो, मात्र स्वतःच्या आरोग्याकडे त्याचे अनेकदा दुर्लक्ष होते. धुळ, ऊन आणि कष्टाचे काम यामुळे कामगारांना विविध आजारांचा सामना करावा लागतो.

> शासकीय योजना आणि अशा प्रकारच्या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून कामगारांनी आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करून घेणे आवश्यक आहे. जेव्हा कामगार निरोगी असेल, तेव्हाच त्याचा परिवार आणि समाज प्रगत होईल.आपण सर्वांनी मिळून कामगार वर्गाच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेसाठी प्रयत्नशील राहायला हवे.
>
> **– सविता आढाव,**
> जिल्हा समन्वयक अधिकारी,
> बांधकाम कामगार.

---

# मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना तात्काळ राबवा

## शेतकरी चळवळीची ठाम मागणी दादासाहेब जंगले पाटील यांचे निवेदन । उपविभागीय अधिकाऱ्यांना सादर

**● श्रीगोंदा । वीरभूमी –** महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने दिनांक २५ मार्च २०२६ रोजी काढलेल्या शासन शुद्धीपत्रकानुसार मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना प्रभावीपणे राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले असतानाही, अनेक ठिकाणी अद्याप पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणे कायम असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकरी चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा-पारनेर उपविभागीय अधिकारी कुमार चिंचकर यांना शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी कायदे सल्लागार ॲड. अजय कडूस पाटील तसेच विविध भागातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले की, शासनाच्या निर्देशांनुसार



पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमण ७ दिवसांत हटविणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. पावसाळा जवळ येत असल्याने परिस्थिती अधिक गंभीर होत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचेही अधोरेखित करण्यात आले.

चळवळीच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे मांडण्यात आल्या यात पाणंद रस्त्यांवरील अतिक्रमणधारकांना तात्काळ नोटीस देऊन ७ दिवसांत अतिक्रमण हटविण्याची सक्तीची कार्यवाही करावी. प्रत्येक तालुक्यात मोजणी व सीमांकनासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. प्रलंबित शेत वहिवाट रस्ते प्रकरणे तातडीने निकाली काढावीत. संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून स्पष्ट वेळापत्रक जाहीर करावे. अतिक्रमणमुक्त रस्त्यांवर तातडीने कामांना सुरुवात करावी. क्षेत्रीय समित्या स्थापन करून नियमित बैठकांचे नियोजन करावे. मोजणी पूर्ण झालेल्या रस्त्यांसाठी प्रति किलोमीटर १५ लाख रुपये निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा. अतिक्रमण हटविण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा. सर्व रस्त्यांचे सीमांकन करून कायमस्वरूपी खुणा/नंबरिंग करावे. ग्रामपंचायती व वैयक्तिक अर्जांद्वारे प्रस्ताव तातडीने स्वीकारावेत.

यावेळी चळवळीच्या वतीने इशारा देण्यात आला आहे की, येत्या दोन महिन्यांत पावसाळा सुरू होण्यापूर्वी वरील मागण्यांवर ठोस कार्यवाही झाली नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रभर शेतकऱ्यांचे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असे दादासाहेब जंगले पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

---

# मोबदला म्हणुन दिलेल्या जमिनी आदिवासींच्या नावावर न झाल्यास भंडारदरा शताब्दी कार्यक्रम उधळून लावण्याचा किसान सभेचा इशारा

**● अकोले । वीरभूमी –** भंडारदरा धरणाला शंभर वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने भंडारदरा धरण शताब्दी वर्ष मोठ्या उत्साहात साजरे करण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र जसे धरण बांधण्याला १०० वर्षे झाली आहेत तसेच धरणातून जे विस्थापित झाले त्यांच्या विस्थापनालाही १०० वर्षे पूर्ण होत आहेत. धरणातून विस्थापित झालेल्या आदिवासींना अद्यापही पिण्यासाठी व सिंचनासाठी भंडारदरा धरणातून पाणी देण्यात आलेले नाही. धरणात बुडालेल्या जमिनीच्या बदल्यात मोबदला म्हणून दिलेल्या जमिनीही आदिवासींच्या पूर्ण नावावर करण्यात आलेल्या नाहीत. वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करून आदिवासींना अद्यापही जमिनीचे मालक करण्यात आलेले नाही.



किसान सभेने या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा संघर्षाची हाक दिली असून याबाबत जागृती मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत दिनांक ७ एप्रिल रोजी हजारो शेतकरी शेंडी, घाटघर, मुरशेत, भंडारदरा या भंडारदरा धरणांच्या मागील गावांमधून मोटारसायकल मार्च करणार आहे. लाँग मार्चला दिलेल्या आश्वासनांप्रमाणे कारवाई न झाल्यास भंडारदरा धरण शताब्दी कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा किसान सभेने दिला आहे. यासंदर्भातले निवेदन अकोले तहसीलदार यांना देण्यात आले असून जलसंपदा विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयालाही याबाबत अवगत करण्यात आले आहे.

भंडारदरा धरणाच्या मागील सर्व गावांना पिण्याचे व सिंचनाचे पाणी निळवंडे उच्चस्तरीय कालव्याच्या धर्तीवर गुरुत्वाकर्षण पद्धतीने द्यावे यासाठी तीन प्रस्ताव किसान सभेच्या वतीने सादर करण्यात आले आहेत. राजुर लोणी लाँग मार्चच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मंत्रालयस्तरीय बैठकीत या प्रस्तावांची व्यावहारिकता व तांत्रिक बाबी तपासून सर्वेक्षण करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत. मात्र संबंधित विभाग या आदेशाची अंमलबजावणी करण्यात चाल ढकल करत आहे. जलसंपदा विभागाच्या शेंडी येथील संबंधित कार्यालयावर दिनांक ७ एप्रिल रोजी जोरदार निदर्शने करून परिसरात वेहिकल मार्च सुरू करण्याचा निर्णय या पार्श्वभूमीवर किसान सभेने घेतला आहे, अशी माहिती डॉ. अजित नवले, सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, ताराचंद विघे, एकनाथ मेंगाळ, तुळशीराम कातोरे, राजाराम गंभीरे यांनी सांगितले.